# GLIMPSES IN LANGUAGE AND LITERATURE

**Chief Editor**

Mr. K.B. Giri

Dr. S.V. Kshirsagar

Dr. S.B. Donge

Dr. S.U. Kalme

ISBN No. 978-93-83995-65-4
Anuradha Publications, Nanded

# Glimpses in Language and Literature

**Chief Editor**
Mr. Kailas B. Giri
Dr. Sanjiv V. Kshirsagar
Dr. Satish B. Donge
Dr. Sachin U. Kalme

**ISBN No.** 978-93-83995-65-4

**Published by:**
Anuradha Publications
Cidco-Nanded

**Publication Year:** 2019-20

**Price-** Rs. 100/-

**Copyright © ACS College, Gangakhed**

**Printed by**
Gurukrupa Offset,
Near Police Station, Gangakhed

**Typesetting by:**
Simran Computers
Gangakhed Dist.Parbhani

**Cover Designby:**
Mr. Imran K. Mohammad

## CONTENTS


| Sr. No. | Content |
|---|---|
| **01** | **Non-Verbal Communication as an Integral Aspect of Personality**<br>Dr. Sanjay N. Kadam & Dr. Tukaram Bobade |
| **02** | **Theme of Partition and Religious Discord in Khushwant Singh's "Treain to Pakistan"**<br>Mr. Kailas B. Giri |
| 03 | आधुनिक हिंदी उपन्यासों साहित्य में दलित चेतना<br>प्रा. डा. निवृत्ती एस. भेंडेकर |
| **04** | **Feminine Consciousness Reflected In Rabindranath Tagore's Play 'Chitra'**<br>Dr. Sanjay N. Kadam |
| 05 | दृक-श्रव्य प्रसार माध्यम : दुरदर्शन और हिंदी विज्ञापन<br>भेंडेकर एन.एस. |
| **06** | **Voice to the Unvoiced In the Play of Mahesh Dattani'S 'Tara'**<br>Mr. Kailas B. Giri |
| 07 | आंबेडकरवादी समीक्षेचा मानदंडः मूल्यवेधी सम्यक समीक्षा<br>डॉ. कीर्तीकुमार मोरे |
| 08 | A Complex East- West Culture Conflict In Girish Karnad's "Driven Snow"<br>Dr. R. T. Bedre, & Dr. Sanjay N. Kadam |
| 09 | आईच्या संवेदनशिलतेने क्रांती घडवू पाहणारी कविता: प्रश्नांची मातृभाषा<br>प्रा.डॉ. कीर्तीकुमार मोरे |
| 10 | Anita Desai's 'Fire on the Mountain: A Critical Study<br>**Mr. Kailas B. Giri** |

# आईच्या संवेदनशिलतेने क्रांती घडवू पाहणारी कविता: प्रश्नांची मातृभाषा

**प्रा.डॉ. कीर्तीकुमार मोरे**
मराठी विभाग प्रमुख
संत जनाबाई महाविद्याय,
गंगाखेड, जि.परभणी
मो. ८२७५८२५८३५

कवी युवराज सोनटक्के हे विदर्भाचे भूमिपुत्र. त्यांच्या आयुष्याचा मोठा काळ बेंगलोर (कर्नाटक) या ठिकाणी गेला. परप्रांतातील आयुष्यक्रमात त्यांनी मराठी, हिंदी आणि इंग्रजी अशा विविध भाषांतून आपल्या अनुभवाचा पट मांडला ते मुळात पदार्थ विज्ञानाचे विद्यार्थी पण मातृभाषेवरील प्रेम आणि त्यांची संवेदनशिलता यांच्यात त्यांच्यातील विज्ञानाचा विद्यार्थी कधी आड आला नाही. सर्जनशील लेखक, कवी, कठोर तत्वचिंतक आणि साक्षेपी समीक्षक अशा विविध भूमिकांत ते वाचकासमक्ष येत राहिले. घअग्निध्वजाङ हा त्यांचा हिंदी कवितांचा संग्रह, घकविता बापाच्याङ, घडॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठी कविता मेंङ इत्यादी अनुवाद कार्य, घOut Breakङ हा इंग्रजी कवितासंग्रह, घक्रिया प्रतिक्रियाङ हा समीक्षा ग्रंथ, घअग्निशाळाङ आणि घप्रश्नांची मातृभाषाङ हे मराठी कवितासंग्रह इत्यादी विपूल लेखन त्यांच्या प्रतिभेची आणि चिंतनशिलतेची साक्ष देते.

विपरीत भोवतालत संवेदनशील मने अस्वस्थ होतात. भावनिक बधिरीकरणाचे भयाकुल वर्तमान बुध्दीवंताच्या मुसक्या आवळते. माणसाचे होत जाणारे वस्तुकरण आणि बाजारीकरण पाहून माणूस म्हणून उभे राहण्याच्या शक्यता हरवतात की काय? असे भले थोरले प्रश्नचिन्ह निर्माण होते. भगवीकरणाचा पाशवी राक्षस उच्छाद मांडत जातो. कपोलकल्पित देवांच्या विटंबना संघर्षाचा वन्ही पेटवत जातात. जातधर्म लिंगभावादी भेदभावांच्या पलिकडे असलेला नितळ माणूस दृष्टीआड होतो. जात्यधर्मातील तत्वज्ञानाचे धिंडवडे काढले जातात. मानवताच कलुषित होते. अशावेळी संवेदनशील मने जागल्याची भूमिका घेत शब्दाची शस्त्रे पाजळतात. असह्य वास्तवाला नेहमी आक्रमतेनेच भिडावे लागते असे नाही. बुध्दाच्या करूणेने आणि मायेच्या ममत्वाने ही व्यवस्था नव्याने रचता येवू शकते हा आशावाद घेऊनच कवी युवराज सोनटक्के यांची प्रश्नांची मातृभाषा जन्म घेते.

विज्ञानाचा विद्यार्थी असणे आणि विज्ञाननिष्ठ दृष्टी असणे यात कमालीची अंतर असते. विज्ञानाचा विद्यार्थी नेहमी विज्ञाननिष्ठ असतोच असे नाही. विज्ञानाचे अनेक विद्यार्थी व्यवहारात कमालीचे अंधश्रध्द असल्याची अनेक उदाहरणे माझ्या दृष्टीपथात आहेत.

युवराज सोनटक्के मात्र त्यास अपवाद आहेत. याचे कारण त्यांनी स्वीकारलेल्या उदात्त मानवातावादी विचारात शोधता येते. तथागत भ. बुध्दांचा प्रतित्यसमुत्पाद o डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रुजवलेली समता, स्वातंत्र्य , बंधुभाव, न्याय आणि मानवता या पंचसुत्रात त्यांची दृष्टी उजळून निघालेली आहे. कवितेतील भावनेला उदात्त विचार भूमिकांची भूमी मिळाली की शब्दांचा मळा अधिक उभारीने फुलत जातो. प्रश्नांची मातृभाषा त्यामुळेच अधिक मूल्यग्राही झालेली आहे.

आपला भोवताल स्वच्छ सुंदर असावा. कुठल्याही कुलूषित विचारांनी आपला अवकाश प्रदुषित होऊ नये. जगणे निरामय अन् सुंदर असावे. माणसाचे माणसाशी असलेले नाते कोणत्याही विभेदांनी काळवंडू नये. साऱ्या विभेदांच्या पलिकडे असलेले प्रेम-मैत्रीचे नाते वृध्दिंगत व्हावे. माणसा-माणसातील नात्यांचे सौंदर्य

कोणीच खरवडू नये. माणूस मोठा आहे. माणूस महान आहे. त्याची प्रतिष्ठा अप्रतिष्ठा होऊ नये. त्यांच्या हृदयातील मांगल्याचे झरे प्रवाहात रुपांतरीत व्हावेत. असे होत नसेल तर वर्तमानाचे वर्तन बिघडले आहे, असे समजावे. प्रेम, मैत्रीवर हिंस्त्रता, क्रौर्य वरचढ होत आहे असे मानावे. ही विपरीतता गंभीर प्रश्नांच्या निर्मितीची जननी बनते.

हे प्रश्न माणसांच्या हिताआड येणाऱ्या व्यवस्थेला विचारले जातात. विश्वात्मक मानवतेच्या विचारांना खिंडार पाडणाऱ्या विघातक विचार प्रवाहाला विचारले जातात. मानवतेचे विहार अपवित्र करणाऱ्या, कुरूप करणाऱ्या विध्वंसकहातांना विचारले जातात. रचनात्मक कार्याची शपथ घेतलेली माणसे क्रौर्याचे उत्तर क्रौऱ्याने देत नसतात. समतेच्या प्रस्थापनेची द्वाही देणारा विचार विध्वंसक नसतो. मानवतेचे किल्ले बांधतांना अमानुषता गाडावी लागते हे खरेच. पण तलवारीचा सामना ढालीने करतो तोच खरा योध्दा असतो. प्रश्नांची मातृभाषा अशा भूमिकेतून आकाराला येते. त्यामुळेच कवी

मला जागरूक जीवनाच्या केंद्रात
मनुष्याला प्रतिष्ठीत करायचे आहे.

अशी प्रतिज्ञा घेतो. आपल्या कवितेचे प्रयोजन काय आहे. याचे सुतोवाचही करून जाते. भोवतालातील बदलत्या सांस्कृतिक मूल्यांना तो नव्याने रचण्याचा प्रयत्न करू पाहतो. आपला हा प्रयत्न यशस्वी होईल की नाही याविषयी संभ्रम त्यांच्या मनात आहे.

मानवी भावनांच्या स्थितीला शब्दांद्वारे
चरित्र-शक्तीच्या रुपात स्वीकृती द्यायची आहे.
अशात संघर्ष भाषेचा अथांग पसारा
शब्दांच्या भरीव भरवश्यावर तगेल काय?

असा त्याचा प्रश्न आहे. हा आणिक अशांसारखे अनेक प्रश्न त्यांच्या पुढ्यात आहेत. कवी त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतो. लेखणी आणि लेखणीच्या शक्तीवरील अदम्य निष्ठा त्याला हतबल होऊ देत नाही. त्यांच्या स्वप्नांच्या दिशेने होणाऱ्या प्रवासात लेखणी उजेड होऊन त्यांची साथसंगत करते.

दर्शित दु:खांचा लेखाजोखा मांडण्यास
माझी लेखणी तत्पर उजेडलिपी घेऊन

हा आशावाद त्यांच्या संघर्षाचे बळ होतो. घ्शब्दांच्या शस्त्रांना वैचारिक उर्जेची धार देतङ ही कविता युध्दसज्ज होतांना दिसते. कवी शब्दांचा खेळ करीत नाही. शाब्दिक चमत्कारावर त्यांचा विश्वास नाही. आपला परिचय शब्दांचा जादुगर म्हणून व्हावा हे कवीचे इप्सित नाही . दुखितांचे दु:ख वेशीवर टांगण्यासाठी त्यांचे शब्द कामी यावेत हीच त्याची आकांक्षा आहे. तो निर्भयपणे आपली वाटचाल करतो. शब्दांच्या साथीने युध्दस्थ होतो. जीवनातील स्थितीशिलता संपवून ते गतिमान झाले पाहिजे. गतिरुध्दतेकडून गतिशिलतेकडे होणारा प्रवास ही कविता चितारित जाते. कवी आणि कवितेचे पीक उदंड जाहले हे खरे! पण आपली कविता प्रस्थापित मळवाटेने जाणारी ठरू नये. सुमार कविंच्या गर्दीत आपली कविता हरवून जाऊ नये, यासाठी तो तिचे सत्व सदोदित जपतो. आपल्या शब्दांनी व्यक्तिगत दु:खांच्या पलिकडे पहावे या श्रध्देने तो आपल्या प्रतिभेचे अंतराळ सजवतो.

घ्प्रश्नांची मातृभाषाङ या कवितासंग्रहात एकूण बावन्न कवितांचा समावेश आहे. आशय, विषयदृष्टया वैविध्यपूर्ण असलेल्या या संग्रहालयातील कवितांना काही विभागात विभागता येईल का? याचा विचार करतांना

ISBN No. 978-93-83995-65-4
Anuradha Publications, Nanded

मी या कविता चार विभागात विभागल्या. मातृसंवेदनात्मक कवितांचा एक गट, दुसरा मानवीय अथवा संविधानक मूल्यभावाची कविता, चरित्रात्मक कविता आणि इतर कविता असे ते चार गट होत.

माय., स्त्रीत्व, स्त्री, दीनम्मा इत्यादी या कवितासंग्रहातील कविता आणि सावित्रीबाई व रमाई वरील कविता चरित्रात्मक असल्या तरी या विभागात नोंदवता होऊ शकतात. त्यानाही मातृसंवेदनात्मक कडा तर आहेच परंतु बाजारवाद, अक्षरांची रांग, सर्जना नितळ दुधाची यासह अन्य कवितात मानवीय संवेदनेच्या छटा सापडतात. घ्मायङ या कवितेवर आदरणीय बडवेसरांनी खूप विस्ताराने आणि सुंदर भाष्य केलंय. खर तर आई (माय) साऱ्याच कवींसाठी अतिशय संवेदनशील विषय. या विषयावर लिहिलं नाही असा कवी सापडायचा नाही. पण माय माझी, त्याची, तिची, प्रत्येकाची त्यांच्यासाठी वेगळी असते. तिचा संघर्ष वेगळा असतो. तिचे भोग आणि कळाछळांच्या स्मृती वेगवेगळ्या असतात. म्हणून ती प्रत्येकाला विदंग्धपणे भावते. ती असते तोवर तिचे अस्तित्वाला नजरेआड करणारे आपण ती नसताना तिच्या अस्तित्वाच्या खूणा शोधतो. तिच्या अभावात ती अधिक जाणवते. ती असतांना तिच्या अस्तित्वाचे आभाळ हाताला लागत नाही, अन् ती नसतांना तिचे अंतराळ आपण शोधतो. कवी आपल्या आईच्या स्मृतीचे पदर घ्मायङ नावाच्या कवितेतून शोधतांना दिसतो. घरात असुनही दुय्यम प्रतींचे जगणे वाट्याला आलेली माय, दुःख काळजात साठवून सुखाने संसाराचा रथ हाकणारी माय, खुप बोलायचे असूनही मोनातच राहिलेली, इच्छा-आकांक्षांना उरातच दडपणारी , स्वतः अंधार पचवून मुलांचा प्रकाश होणारी , आप्तस्वकीयांचे सारे मुकपणे करणारी, स्वतः स्वतंःच्या सांत्वनार्थ उभी राहणारी, सामाजिक, सांस्कृतिक दास्याचे ओझे वागवणारी अशी आईची कितीतरी रुपे चित्रित करणारी कविता युवराज सोनटक्के यांनी अतिव संवेदनशीलतेने लिहिली आहे. आपण आपल्या आईसाठी काही करू शकलो नाही, हा अपराधभाव ही या कवितेतून व्यक्त झालेला आहे.

तू ठेवून गेलीस माझ्यासाठी उजेड
आणि आपल्यासाठी अंधार
माय, अग्निध्वजावर जेंव्हा नोंदतो तुझे नाव
युवराजाच्या मुकूट घातल्यासारखे वाटते मला...

ही भावना उगाच जन्म घेत नसते.

माय ही दीर्घ कविता आहे. एकूण आठ स्वतंत्र तुकड्यात घ्मायङ ची विभिन्न रुपे तरी माय, हेच अंतसूत्र! आणि तरीही तिच्या आखणीत कविच्या चरित्रात्मक बंधाची होत गेलेली सहज गुंफन या दृष्टीनेही कविता महत्वाची वाटते. अभावात्मक जगण्याचे क्लेश डोळ्यात दिसू. न देणारी माय, अभावात्मक जगणे जगणाऱ्या विश्वात्मक स्त्रीचे प्रतिनिधिक रुप होऊन प्रस्तुत कवितेत अवतरते.

मुलगी जन्माला येणे हा अभिशाप मानल्या जाणाऱ्या व्यवस्थेत स्त्रीत्वाचे, स्त्रीचे होत जाणारे हाल आणि स्त्रीला पचवावे लागणारे हलाहल सोनटक्के यांच्या कवितेचा विषय होतो.

कौर्याच्या भिंतीत चिनल्या जाणाऱ्या सुंदर अनारकळ्या
ऐका युवतीच्या आतील आगीच्या आर्त किंकाळ्या

इत्यादींसारख्या ओळींतून स्त्री दुःखाचे अंगारवस्त्र कवी विनतो. समग्र स्त्री जवीनाचे सारतत्व मांडण्यासाठी लेखणी झिजवतो. स्त्रीचे होणारे वस्तूकरण त्याला मान्य नाही. तिची बाजारवादी व्यवस्थेत देणारी जाहिरात आणि जाहिरातीतील तिचे अनावृत्त होणे त्याला मान्य नाही. बाजारवाद्यांचे फोफावत जाणारे उद्योग त्याला घ्कुटीरङ उद्योग वाटतात. बाजाराच्या मायावी दुनियेत स्त्रीचे होणारे अधःपतन त्याला अस्वस्थ करते. परंपरेच्या नावाने असो की, बाजारवाद्यांच्या नावाने स्त्रीचे दुय्यमत्व त्याला मान्य नाही. स्त्री विशुध्द

मानव आहे. माणूस आहे. बाईमाणूस नव्हे! ह्या नव्या धारणा त्यांच्यातील समतादृष्टीचे प्रतीक होत. स्त्री-पुरूष समानतेच्या एकूण अंगावर मिरवणारी ही कविता म्हणूनच उदात्त, विशाल मानवतेचा मंगल परिवेश धारण करीत व्यक्त होते.

मुलीही असतात मनुष्य
ज्यांच्यासाठी असवांनी
रडत असते क्षुब्ध मानवता
नष्ट केला जात असतो.
मुलींचा आंतरिक अस्तित्वबोध...

स्त्रीयांच्या अस्तित्वबोधाची मंगलवाट समतेच्या, मानवतेच्या अंगनात स्थीर व्हावी हा आशावाद या कवितांचे प्राणतत्व होय.

सावित्री जोतीराव फुले, रमाई, दीनम्मा, शिखर पुरूष-१, शिखर पुरूष-२, तथागत बुध्द, विज्ञानमातृक बुध्द इत्यादी चरित्रात्मक कविताही या संग्रहात येतात. बाबासाहेबांच्या आधी रमाई , महात्मा फुल्यांआधी सावित्री अशा अग्रक्रमाने स्त्री या कवितासंग्रहात येते. महापुरूषांच्या आयुष्यात या स्त्रीया नसत्या तर? हा प्रश्न कळीचा ठरू शकतो. सावित्री रमाईच्या त्यागामुळेच फुले-आंबेडकरांचे जीवन सफल, समृध्द झाले, हे कदापि नाकारता येत नाही. या घअग्निशिळाङ च्या समर्पनामुळेच फुले-आंबेडकरांचे जीवन घअग्निध्वजाङ होऊन क्षितिजावर फडकत आहे, हे निर्विवाद मान्य करावे लागते. जोतीरावांची प्रेरक शक्ती सावित्री आणि बाबासाहेबांच्या भाषेला ऊर्जा देणारी संजीवनशक्ती रमाई युवराज सोनटक्के यांनी यथार्थ शब्दात चित्रित केली आहे. तर बाबासाहेब, शोषितांसाठीचा शब्दकोष, राष्ट्रहिताची ऊर्जा, क्रांतीचा अगाधपुरूष, समतेचे सुंदर फळ , समाजसंरचनेच्या स्तंभावरील प्रखर झेप, इत्यादी सुचक प्रतिमातून साकार होतात. तथागत बुध्द या कवितेत कवी बुध्द तत्वज्ञानचे सारतत्व मांडतो. बुध्द तत्वज्ञानाचा गाभा असलेला प्रतित्यसमुत्पाद, चार आर्यसत्ये, आर्यअष्टांगिक मार्ग , प्रज्ञा, करुणा,शील, निब्बाण, अनित्यता इत्यादी सारे लिलया कवितेच्या बंधात बांधतो. बुध्दाचा उल्लेख तो प्रथम बुध्दीवादी शास्ता असा करतो. बुध्द विचारात अमुलाग्र क्रांतीची पायवाट प्रशस्त करण्याचे सामर्थ्य असल्याचे सुचवतो. चरित्रात्मक कविता केवळ चरित्र नायकाचे चरित्र मांडणारी नसते ती विचारांचा उर्जस्वल स्वर तीव्र करणारी असते हे या कवितांतून सांगितले आहे.

आंबेडकरवादी कविता एक मोठा काळ तीव्र व्रिदोहाची भाषा बोलत होती. आक्रस्ताळेपणा, एकसुरीपणाचे आरोप झेलत होती. किंबहुना ती ढसाळांच्या कवितेच्या पुढे जाऊ शकली नाही, अशीही तिची संभावना झाली. नव्वदोत्तर आंबेडकरवादी कविता ह्या साऱ्या आरोपांना झुगारत पुढे जातांना दिसते. अतीव संयत, सौम्य भाषेत ती काळाशी संवाद करते. आंबेडकरवादी विद्रोहाचा परिपक्व आविष्कार आणि बुध्दाच्या करूणेचा साक्षात्कार तिला मुल्यात्मक भान देतो. ती अधिक धारदार होते पण बोचरी होत नाही. ती विचारप्रवर्तक होते पण रक्तबंबाळ करीत नाही. ती रचनात्मक होते पण हिंसक होत नाही. असंतोषाची सनातन मुळे खोदतांना विचारांची शस्त्रे संयतपणाने चालवते. विभेदांच्या भिंती पाडण्यासाठी लेखणीचा उपयोग कसा केला पाहिजे याची दीक्षा आंबेडकरवादी कवितेने साहित्याला दिली आहे. याचा प्रत्यय सोनटक्के यांच्या कवितेतून येतो.

स्वातंत्र्य , समता, न्याय, बंधुता आणि मानवता हे तथागत बुध्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिविताचे नि तत्वज्ञानाचे सार आहे. नवी आंबेडकरवादी कविता या प्रशस्त अवकाशात विहरतांना दिसते. सोनटक्के यांच्या कवितांचे जैविक घटक स्वातंत्र्य , समता, न्याय, बंधुता व मानवता हेच आहेत. हेच भारतीय

संविधानाचे सारतत्व आहे. संविधानक मुल्यांचा आग्रह म्हणजे फुले आंबेडकरी विचारांचा आग्रह, हा आग्रह त्यांच्या कवितांच्या केंद्रस्थानी आहे. त्यांचे पोषण हा कवीचा श्वास आहे.

मुखाला भयंकराच्या
फासते राखच काळे
हाती जीवनयात्रेच्या
हे संविधान निराळे

सोसून युगापासून
विषमतेचे बंधन
प्रतिक्षेत समतेच्या
आतूर प्रत्येक जन

संविधान समानतेची आश्वासक व्यवस्था आहे. वर्तमान मात्र विसंगत आहे. लोकशाही उशाला ठेवून सत्तांध हुकूमशाहीच्या दिशेने झेपावत आहेत. माणूस लहान अन् धर्म मोठा केला जातोय. भावनिक वादळात विचारशक्तीचे अवगुंठन केले जातेय. समता सरणावर ठेवली जातांना आपण आपण उघड्या डोळ्यांनी पाहतो आहोत.

कुस वांझोटी तमाची
उजवी उजेड वारे
शय्येवर समतेच्या
भरवस्याचे किनारे

वांझोटी कुस प्रसवाच्या शक्यता हरवून बसते म्हणून ती अंधार पसरवू शकणार नाही. समता शय्येवर असली तरी ती सरणार नाही हा विश्वास या कवीतेत कवी व्यक्त करतो.

इतर कविता या घटकात साधारणपणे चळवळीच्या कविता म्हणून दीक्षाभूमी व नामांतर या कविता येतात. जाणीव, संवेदना, अनुभूती , वर्तन इत्यादी काही मानसशास्त्रीय शीर्षके असलेल्या कविता आणि कवी विज्ञानाचा विद्यार्थी असल्याची जाणीव होईल असा आशय घेऊन अवतरलेल्या काही कवितांचाही एक भाग या संग्रहात येतांना दिसतो. दुष्काळग्रस्त प्रदेशातून, अनामिक, यथार्थमूल्य, हटवादी, इत्यादी काही कवितांचा उल्लेख या सदंर्भात करता येतो.

मला या संग्रहातील सर्वात आवडलेली कविता म्हणजे कविता संग्रहाचे शीर्षक नाम असलेली घ्रश्नांची मातृभाषाङ ही कविता. कवितेच्या सर्व निकषांवर ही कविता सर्वार्थाने उतरते. अनुभव परिपक्व असला की शब्दांना उत्कट अभिव्यक्तीच्या वाटा गवसतात. उत्स्फूर्त स्वाभाविक अभिव्यक्ती असली की कविताही उत्स्फूर्त आणि सहज होते. हाच अनुभव ही कविता वचातांना येतो.

वर्तमानाचे वर्तन इतिहासातही भयाकूलच होते ही सार्वजनिक प्रतिती. भयातूर एकांताचे संपुष्टात येणे केवळ आणि केवळ क्षणभंगूर ठरते. पुन्हा गतीशिल जीवनाचे चाक भयाकुल अंधारात रुतवले जाते तेंव्हा कवीला प्रश्न पडतात.

मी विचारले वर्तमानाला अगत्यपूर्वक
क्षिताजाच्या गर्भातून का उत्पन्न होतात
स्थितीशील सौंदर्याचे अति निर्वाह्य निर्णय?
मौनाच्या असह्य गर्दीत का जागवत नाही.

नव्या पारदर्शक विवेकाची सुसह्य लय?

कवी आपल्या मनातील असंतोषाचा अंगार ज्या प्रसंगातून फुलवित जातो तेथेही त्यांचा तोल ढळत नाही. विखार व्यक्त करतांना तो अगत्यपूर्वक करतो. त्याची ही अगत्यपूर्वकता त्यांच्या संचतेचे नि संवेदनशीलतेचे रुपक बनून व्यक्त होते. कधी त्याला

धरतीच्या देहाचे ग्लेशिअर वितळण्यासाठी
तिच्या संकल्पित वक्षावर का होते बळजोरी?
असाही प्रश्न पडतो तर
अपराधांच्या सोबत उध्वस्त का होत नाही
अहंकाराच्या सळसळणाऱ्या श्वासांची मुजोरी?
सभ्यतेला का पोखरते अवसानी मगरूरी

असेही वाटते. हे अहंकार जात, धर्म वर्णभेदाचे असतात. श्रेठाश्रेष्ठतेचे असतात आणि याच अहंताचा भस्मासूर सभ्यतेचा बळी घेतो. माणूस श्रेष्ठ आहे, ह्या अनादी मूल्यांना पोखरतो. समतामूलक समाजाचे स्वप्न साकार होण्याच्या शक्यतांना काळीमा फासतो. पण हा कवी पराभूत होत नाही. त्यांने त्यांच्या स्वप्नांची होळी होतांना पाहिली तरी, तो स्वप्न पाहणे सोडत नाही. त्याची कविता जागल्याची भूमिका घेणे सोडत नाही. दुर्बलांच्या जीवनात आशेची बाग फुलविणारी कविता म्हणून मी या कवितेकडे पाहतो. उपेक्षित, सर्वहारा समाजाचा श्वास मानवतावादी विचार आहे. आपल्या कवितेने इमाने इतबारे या मार्गावरून चालले पाहिजे ही या कवितेची भीमप्रतिज्ञा आहे.

कवी आपल्या मनीचे आर्त व्यक्त करण्यासाठी निसर्ग प्रतिमांचा लिलया वापर करतो.

माझ्या कवितेची प्रश्नचिन्हांची विश्वसनीय दृष्टी
समुद्राच्या नेत्रांना अशी अनुभवते
खवळलेल्या सागराची गाज म्हणजे
त्याने शोषलेल्या असंख्य नद्यांच्या आर्त किंकाळ्या काय?
समुद्राच्या उत्तुंग लाटा म्हणजे त्यांच्या बहुपाशात
समर्पित तृषित नद्यांच्या हुंदक्याचे रुंदन काय?
अशा शोषक-शोषितांच्या क्रोर्य-धैर्याचे मानवीकरण
प्रखर प्रश्नांच्या मातृभाषेत मांडता येईल काय?

खरोखर कवितेला शोषक-शोषित संदर्भाने पडलेले प्रश्न प्रखर आहेत. सांगराच्या प्रतिमेतून शोषक-शोषित संदर्भांचा, विभेदांचा सांस्कृतिक पट अधोरेखित होत जातो. शोषितांच्या तृषार्ततेला नवे संदर्भ प्राप्त होतात. घ्कौर्य-धैर्याचे मानवीकरणङ ही प्रतिमा आणि तिची उत्स्फूर्त योजना यामुळे ती सहज होत जाते. आणि या दोन ध्रुवांना मानवीय साखळीत बांधू पाहणारे मातृहृदय या कवितेतून व्यक्त होते. विस्कटलेले समाजजीवन विरुप आहे. कुरूप आहे, विभेदपूर्ण आहे. कवीला त्यांच्याशी लढा जरुर द्यावयाचा आहे. नवसमाज निर्माण करावयाचा आहे. रक्तरंजित नव्हे, त्याला रक्त सांडल्याशिवाय क्रांती करावयाची आहे. म्हणूनच प्रश्नांची मातृभाषा या कवितेची वाट पृथक आहे. कवी या वाटेवरला आमचा सहपथिक आहे त्याला आणि त्याच्या लेखनाला उदंड शुभेच्छा!

*********

ISBN No. 978-93-83995-65-4
Anuradha Publications, Nanded